**महाराष्ट्र शासन**
ग्राम विकास विभाग,
बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई ४०० ००१

---

## जाहीर सूचना

ग्राम विकास विभाग, महाराष्ट्र शासन

याद्वारे सूचित करण्यात येते की, राज्यातील सर्व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या सन २०२२-२०२३, २०२३-२०२४ तसेच २०२४-२०२५ या तीन आर्थिक वर्षाच्या लेखापरीक्षणासाठी त्या त्या विभागातील सनदी लेखापालांचे अर्ज मागविण्यात येत आहेत.

अंतिम दिनांक : ५ मे, २०२३

अधिक तपशीलासाठी (नमुना अर्ज, संमतीपत्र, प्रपत्र 'अ' इ.) ग्राम विकास विभागाची www.rdd.maharashtra.gov.in ही वेबसाईट पहावी.

आदेशानुसार

**महाराष्ट्र शासन**

ग्राम विकास विभाग,

बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ,

फोर्ट, मुंबई ४०० ००१.

## <u>जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या लेखा परिक्षणासाठी सनदी लेखापालांची नियुक्ती करण्यासंदर्भातील अटी व शर्ती</u>

विभागीय आयुक्त कार्यालयामार्फत सनदी लेखापालांच्या नियुक्तीची प्रक्रिया चालू करण्यात आली होती. परंतु सदर प्रक्रिया रद्द झाल्याने शासन स्तरावरुन नव्याने अर्ज मागविण्यात येत आहेत. त्यासाठी सर्व विभागातील जिल्हयांच्या जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या कार्यालयांचे सन २०२२-२०२३, २०२३-२०२४ व २०२४-२०२५ या तीन आर्थिक वर्षाच्या लेखा परिक्षणासाठी प्रत्येक जिल्हयातील यंत्रणेसाठी प्रत्येकी आठ याप्रमाणे सनदी लेखापालांच्या पॅनलची नियुक्ती करावयाची असल्याने नोंदणीकृत सनदी लेखापालाकडून नव्याने अर्ज मागविण्यात येत आहेत. इच्छूक सनदी लेखापाल हे सक्षम प्राधिकरणाकडे नोंदणीकृत असावेत आणि त्यांना किमान ३ वर्षाचे लेखा परिक्षणाचा अनुभव असावा. लेखा परिक्षणासाठी अर्ज करणा-या सनदी लेखापालाने कुठल्याही जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे सन २०२०-२०२१ व २०२१-२०२२ या आर्थिक वर्षाचे लेखा परीक्षण केलेले नसावे. इच्छुक सनदी लेखापालांनी आपापल्या विभागासाठीच अर्ज सादर करावेत. एक सनदी लेखापाल एकाच अर्जाद्वारे विभागातील सर्वच जिल्हयासाठी पसंतीक्रम देऊ शकेल. तसेच वरील प्रमुख नियम अटींसह शासनाच्या प्रचलित इतर सर्व नियम, अटी/सूचना ज्या सनदी लेखापालास मान्य असतील अशाच सनदी लेखापालांनी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या लेखापरिक्षणासाठी उप सचिव (केंद्रीय योजना) ग्राम विकास विभाग, बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई ४०० ००१ यांचेकडे लेखी अर्ज करावेत.

लेखा परिक्षणाचे शुल्क खालील प्रमाणे राहतील.

अ) रुपये ५० कोटी पर्यंत खर्च असलेल्या यंत्रणा कार्यालयासाठी -- रुपये ५० हजार

आ) रुपये ५०,००,००,००१-ते ७५,००,००,०००-खर्च असलेल्या यंत्रणा कार्यालयासाठी -- रुपये ६० हजार

इ) रुपये ७५,००,००,००० पेक्षा जास्त असलेल्या यंत्रणा कार्यालयासाठी -- रुपये ७० हजार

वर नमूद लेखा परिक्षण शुल्काव्यतिरिक्त अन्य कोणत्याही प्रकारचे शुल्क किंवा भत्ता अनुज्ञेय असणार नाही. लेखापरीक्षणामध्ये गट पातळीवरील तसेच निवडक ग्रामपंचायतीच्या लेख्यांच्या परीक्षणामध्ये समावेश राहील. लेखापरीक्षण अहवाल जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा कार्यालयास सादर करण्याबाबतची मुदत आणि विहित मुदतीत अहवाल यंत्रणा कार्यालयास सादर न केल्यास दंड वसूल करणे यासाठी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा कार्यालयाशी सनदी लेखापालाने लेखी करार करणे बंधनकारक आहे. सदरच्या करारातील अटींना अधिन राहून लेखापरीक्षण करणे आवश्यक राहील. जाहीराती संबंधी व योजनेसंदर्भात अधिक माहितीसाठी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा कार्यालयास संपर्क साधावा.

**<u>अर्ज स्वीकारण्याचा अंतिम दिनांक ५ मे, २०२३ आहे.</u>**

इच्छूक सनदी लेखापालांनी विहित नमुन्यातील अर्ज कार्यालयीन वेळेत **दिनांक ५ मे, २०२३** पर्यंत उप सचिव (केंद्रीय योजना) ग्राम विकास विभाग,बांधकाम भवन,२५ मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई ४०००१ यांचेकडे **hard copy** सादर करणे आवश्यक आहे. तसेच ई मेल आयडी aoyoj2.rdd-mh@nic.in या ईमेलवर दाखल करावेत. कोणतेही कारण न दर्शविता स्वीकृतीचे किंवा नाकारण्याचे अधिकार अ. मु.स. (ग्राम विकास) यांनी राखून ठेवले आहेत.

दिनांक

स्थळ -मुंबई

अपर मुख्य सचिव यांचे मान्यतेने

**महाराष्ट्र शासन**
ग्राम विकास विभाग,
बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई ४०० ००१

प्रति,
मा. अपर मुख्य सचिव,
ग्राम विकास विभाग
बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई ४०० ००१.

विषय : जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा --------- चे सन २०२२-२०२३, २०२३-२०२४ व २०२४-२०२५ चे लेखापरीक्षण करण्यासाठी सनदी लेखापालांची नियुक्ती मिळण्याबाबत अर्ज.

संदर्भ : आपले जाहीर प्रगटन वृत्तपत्र ---------------- दिनांक

महोदय,

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जिल्हा --------------- चे सन २०२२-२०२३, २०२३-२०२४ व २०२४-२०२५ चे लेखापरीक्षण करण्यासाठी सनदी लेखापालांची नियुक्ती मिळण्यासाठी तपशीलवार माहिती खालीलप्रमाणे कागदपत्रांच्या पुराव्यासह सादर करीत आहे.

| अ.क्र. | आवश्यक माहितीचे विवरण | |
|---|---|---|
| १ | सनदी लेखापालाचे पूर्ण नाव | |
| २ | फर्मचे नाव व स्थापना वर्ष | |
| ३ | संपूर्ण पत्ता | |
| ४ | दूरध्वनी क्रमांक/भ्रमणध्वनी क्रमांक | १) कार्यालय |
| | | २) निवास |
| | | ३) फॅक्स |
| | | ४) ई-मेल पत्ता |
| | | ५) भ्रमणध्वनी क्र. |
| ५ | फर्मची सरासरी वार्षिक उलाढाल (वर्ष २०१९-२० ते २०२१-२२) सोबत ३ वर्षाचे बॅलेन्स शीट जोडावे | |
| ६ | सनदी लेखापाल नोंदणी C & AG कडे वर्ष २०२२-२०२३ करिता | |

<table>
<tr><td></td><td>आणि Institute of Charted Accountants of India चे प्रमाणपत्र जोडावे</td><td></td></tr>
<tr><td>७</td><td>व्यवसायाचे ठिकाण/संपूर्ण पत्ता</td><td></td></tr>
<tr><td>८</td><td>शैक्षणिक गुणवत्ता</td><td></td></tr>
<tr><td>९</td><td>अनुभवाचा कालावधी (वर्ष) व त्याविषयी वर्षनिहाय तपशील किमान तीन वर्ष अनुभव आवश्यक<br>(प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे.</td><td>
<table>
<tr><td>अ.क्र.</td><td>लेखापरीक्षण केलेल्या संस्थेचे नांव</td><td>लेखापरीक्षण केलेले वर्ष</td><td>संस्थेची आर्थिक उलाढाल (रु. लाखात)</td></tr>
<tr><td></td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td></td><td></td><td></td><td></td></tr>
</table>
</td></tr>
<tr><td>१०</td><td>उपलब्ध व्यावसायिक कर्मचारी वर्ग/फर्ममधील पार्टनर<br>(स्वतंत्र प्रपत्र जोडणे आवश्यक</td><td>
<table>
<tr><td>अ.क्र.</td><td>कर्मचा-याचे/पार्टनरचे नाव</td><td>कायम/ तात्पुरता</td><td>शैक्षणिक अर्हता</td><td>अनुभव</td><td>ICAI मध्ये नोंद आहे काय</td></tr>
<tr><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
</table>
</td></tr>
<tr><td>११</td><td>सध्या कोणत्या जिल्हयात काम करतात त्या जिल्हयाचे नाव</td><td></td></tr>
<tr><td>१२</td><td>ज्या यंत्रणेचे लेखा परीक्षण करावयाचे आहे त्या जिग्राविं यंत्रणेचे नाव (पसंतीनुसार)</td><td>१) २) ३) ४)</td></tr>
<tr><td>१३</td><td>या पूर्वी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेकडे लेखा परीक्षण केले असल्यास जिग्राविंयं चे नाव व ते वर्ष नमूद करावे तसे अनुभवाचे प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.</td><td></td></tr>
<tr><td>१४</td><td>ज्या जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे लेखा परिक्षणसासाठी अर्ज केला आहे त्या जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे मागील सलग ३ वर्षापासून २०१९-२०, २०२०-२१, २०२१-२२) मध्ये लेखा परिक्षण केले आहे काय?</td><td></td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| | १. असल्यास कोणत्या वर्षात<br>२.नसल्यास संबंधित जिल्हा विकास ग्रामीण यंत्रणेचे मागील सलग ३ वर्षापासून लेखा परिक्षण केले नसल्याचे संचालक, जिग्राविय याच्या स्वाक्षरीचे) प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. | |
| १५ | शासन अटी, नियम मान्य असल्याबाबतचे संगती पत्रे जोडले आहे काय (होय/नाही) | |
| १६ | खालील तीन वर्षाचे आयकर क्लिअरन्स प्रमाणपत्र जोडले आहे काय? (होय/नाही) सन २०१९-२०२०, २०२०-२०२१, २०२१-२०२२ | |
| १७ | स्थापनेपासून आजतागायत फर्म काळया यादीत नसल्याचे प्रमाणपत्र | |

कार्यालयाचा शिक्का

दिनांक

भ्रमणध्वनी क्र. -------

(सनदी लेखापालाची सही)

नाव ------------------------

पत्ता -----------------------

संमतीपत्र

## जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या लेखा परीक्षणासाठी सनदी लेखापालांची नियुक्ती करण्यासंदर्भात अटी व नियम

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या लेखा परीक्षणासा अटी व नियमांधे संक्षिप्त तपशील खालीलप्रमाणे आहे

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या सर्व योजनांचे ( केंद्र । राज्य) लेखा परिक्षण योजनानिहाय करुन योजनानिहाय लेखा परीक्षण अहवाल यंत्रणेस सादर करणे. योजनांची नावे पुढीलप्रमाणे आहेत : - नाव

१ SGSY/MSRLM २.IAY & Other Habitational Schemes PMAYG (viz.upgradation, Credit Cum Subsidy, PMGRY) ३.DPAP ४.Hariyali ५.WDP ६.DRDA(Administration) ७.TRYSEM/Mini ITI ८. Payment of Extension Officer ९. Housing for fisheries १०.PURA (Providing Urban Amenities in Rural Areas ) ११.BPL Survey १२.About unspent balances of DRDA Old schems १३.Rajiv Gandhi Nivara Yojna १४.Rashtriya Samavikas/BRGF १५ Rurban १६. Any other Centre/ State schemes emplemented through DRDA. या व्यतिरिक्त यंत्रणा राबवित असलेल्या सर्व योजनावाबतचा तपशील जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेकडून प्राप्त करून घ्यावा.

२) यंत्रणाच्या लेखा परिक्षणामध्ये गट पातळीवरील तसेच निवडक ग्रा. पं.च्या लेख्यांचा समावेश राहील

३) सनदी लेखापाल यांनी, लेखा परिक्षण शासनाने विहित केलेल्या शुल्कात करून देणे आवश्यक आहे. शासनास विहित केलेले लेखा परिक्षण शुल्क खालीलप्रमाणे आहे.

अ) रुपये ५० कोटी पर्यंत खर्च असलेल्या यंत्रणा कार्यालयासाठी --रुपये ५० हजार

ब) रुपये ५०,००,००,००१-ते ७५,००,००,०००-खर्च असलेल्या यंत्रणा कार्यालयासाठी – रुपये ६० हजार

क) रुपये ७५,००,००,००० पेक्षा जास्त असलेल्या यंत्रणा कार्यालयासाठी – रुपये ७० हजार

या शुल्का व्यतिरिक्त सनदी लेखापालास अन्य कोणत्याही कारणास्तव कसलाही भत्ता अनुज्ञेय असणार नाही.

४) सनदी लेखापालाने त्यांच्या अहवालात केंद्र शासनाचे पत्र No.PAO/Special Cell (RD) २००३-०४/१९८ दि.२२/६/२००४ च्या पत्रान्वये दिलेल्या सूचनांप्रमाणे कार्यवाही करून बाबी प्रमाणित करणे आवश्यक आहे, तसेच सनदी लेखापालाने लेखा परिक्षण अहवालात खालील बाबी प्रामुख्याने प्रमाणित करणे आवश्यक आहे.

a) योजनेचे सर्व अद्ययावत मार्गदर्शक सूचनांचा अभ्यास करुन त्या अनुषंगाने लेखा तपासणी केली आहे.

b) केद्र शासनाने वितरित केलेले अनुदानाचे प्रमाणात राज्य शासनाने अनुदान वितरित कैलेले आहे. (अनुदान वितरणाच्या निश्चित प्रमाणानुसार) तसे नसल्यास संविस्तरकमी । जास्त निधिचा तपशील,

c) लेखा तपासणी कालावधीत योजनेचा पैसा ज्या बॅकेत ठेवला आहे त्या बंकेशी ताळमेळ घालणे.

d) जिल्हास्तरावरील सर्व तालुक्यासाठी एकत्रित मत्ता नॉदवही अद्यावत ठेवण्यात आली आहे.

e) कोणत्याही अग्रीम रक्कमा परस्पर खर्च करून दाखविण्यात आलेल्या नाहीत तसेच एका वर्षापेक्षा अधिक कालावधीसाठी दिलेल्या अग्रीमाचा अहवालात अंतर्भाव करण्यातआलेला आहे.

f) वरील प्रमाणपत्राशिवाय त्या त्या योजनेकरिता आवश्यकअसणारी प्रमाणपत्रे लेखापालाने दयावीत.

g) एका योजनेचा निधी अन्य योजनेकडे वळविण्यात आलेला नाही या बाबतचे प्रमाणपत्र

h) एका योजनेसाठी एकच बँक खाते ठेवण्यांत आलेले असल्याबाबतचे प्रमाणपत्र.

५) केंद्र शासनाचे सुधारित लेखांकन पध्दती नियम १९८४ मधील मार्गदर्शक नियम २७ (बी) नुसार जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या लेखा परिक्षणासाठी सनदी लेखापालाने मागीलसलग ३ वर्षोपासून (२०१९-२०,२०२०-२१,२०२१-२२ या वर्षात) जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे लेखा परिक्षण केलेले नसावे.

६) वरील प्रमाणपत्रांशिवाय संबंधित योजनेकरिता आवश्यक असलेले लेखा संबंधित प्रमाणपत्रे सनदी लेखापालांनी द्यावेत.

७) सनदी लेखापालांनी प्रत्येक योजनानिहाय स्वतंत्र लेखा परिक्षण अहवाल प्रत्येक वर्षी ३१ ऑगस्ट पूर्वी सहा प्रतीत यंत्रणेस सादर करण्याचे बंधनकारक राहील.

८) मुदतीत लेखा परीक्षण अहवाल सादर न करणा-या सनदी लेखापालाच्या शुल्कातून १० टक्के रक्कम कपात करण्यात येईल.

९) सनदी लेखापालास अहवाल जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या कार्यालयास सादर करण्याबाबतची मुदत आणि विहित मुदतीत अहवाल सादर न झाल्यास दंड वसुल करणे तसेच लेखा परिक्षणासाठी निश्चित केलेल्या शुल्का व्यतिरिक्त अन्य कोणत्याही प्रकारचे शुल्क/कर किंवा इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय असणार नाही यासाठी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा कार्यालयाशी सनदी लेखापालाने लेखी करार करावा सदरील करारनाम्यामध्ये शासन सदरील करारनामा सबळ कारणावर कोणत्याही टप्प्यावर संपुष्टात आणू शकेल याचा समावेश राहील.

१०) सनदी लेखापालास जिग्राविय‍ं कार्यालयास अर्ज करताना तो विहित नमुन्यात करावा लागेल (अर्जासोबत प्रत्येक बाबींचा पुरावा म्हणून संक्षम प्राधिकरणाच प्रमाणपत्र जोडण्यात यावे.)

a) सनदी लेखापाल सक्षम प्राधिका-याकडे Institute of Chartered Accountants of India आणि C&AG कडे नोंदणीकृत असावा

b) सनदी लेखापाल ज्या जिल्हयात काम करीत आहे त्या जिल्हयाचा संपूर्ण कार्यालयाचा पत्ता

c) सनदी लेखापालास किमान तीन वर्षाचा अनुभव असावा, अर्जासोबत सनदी लेखापालाना त्यांचे अनुभव व लेखा परिक्षणाविषयी अनुभव प्रमाणपत्र देणे गरजेचे आहे.

d) सनदी लेखापालानी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे लेखा परिक्षण करण्यापूर्वी जिग्राविय‍ं संबंधित लेखा परिक्षण केल्याचे प्रमाणपत्र.

e) शासन निर्णयाप्रमाणे विहित क्लेले नियम अटी मान्य असल्याबद्दल करारपत्र.

f) शासनाचे प्रचलित नियमाप्रमाणे २०१९-२०, २०२०-२१, २०२१-२२ च्या वर्षाचे आयकर भरल्याचे प्रमाणपत्र

g) फर्ममधील उपलब्ध कर्मचारी वर्ग/ पार्टनर्सच्या माहितीचे विहित नमुन्यातील स्वसाक्षांकित प्रमाणपत्र

h) फर्म काळया यादीमध्ये नसल्याबाबत स्वसाक्षांकित प्रमाणपत्र

वरील सर्व १ ते १० नियम व अटीचे मी वाचन केले असून शासनाचे सर्व नियम । अटी व भविष्यात शासनाने दिलेल्या सूचना, नियम व अटी, नियमातील फेरबदल मला मान्य राहतील तसेच याबाबत जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणांशी करारनामा करण्यास हे संमतीपत्र देत आहे. कोणतेही कारण न दर्शविता अर्ज स्वीकृत करण्याचे किंवा नाकारण्याचे अधिकार अपर मुख्य सचिव (ग्राम विकास) यांनी राखून ठेवले आहेत. सनदी लेखापालांशी केलेला करारनामा सबळ कारणावरुन कोणत्याही टप्प्यावर शासन संपुष्टात आणू शकेल, याबाबत माझा कसलाही आक्षेप राहणार नाही.

करिता सदरील नियम व अटी मान्य असल्याचे संमती पत्र देत आहे.

कार्यालयाचा शिक्का

दिनांक

(सनदी लेखापालाची सही)

नाव

पत्ता

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेने दयावयाचे प्रपत्र खालीलप्रमाणे

प्रपत्र "अ"

सनदी लेखापाल नियुक्ती अर्ज व संमतीपत्र उपलब्ध करुन दिल्याबाबत तसेच पूर्वीच्या नियुक्त्या तक्रारी/आक्षेप इत्यादीबाबत तपशिल

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा विभाग

| अ.क्र. | सनदी लेखापालाचे नांव | अर्ज व संमतीपत्र जिग्रावियंकडे उपलब्ध करुन दिल्याचा दिनांक | जिग्रावियंचे मागील सलग ३ (२०१९-२०, २०२०-२१, २०२१-२२ ) लेखा परीक्षण केलेले आहे काय? | जिग्रावियंचे यापूर्वी लेखापरीक्षण केल्याचा कालावधी | सनदी लेखापालाच्या व्यवसायाचा जिल्हा | अर्ज उपलब्ध करुन दिलेल्या सनदी लेखापालाच्या नेमणुकीबाबत जिग्रावियंचे आक्षेप/तक्रार असल्यास तपशील | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| | | | | | | | |
| | | | | | | | |

प्रकल्प संचालक
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा

# अर्जासोबत जोडावयाचे कागदपत्रांची यादी

१ फर्मचे C&AG कडे आर्थिक वर्ष २०२२-२०२३ करीत नोंदणी केले प्रमाणपत्र (होय/नाही)

२. ICAI कडे नोंदणी केलेले प्रमाणपत्र (होय/नाही)

३. फर्म मागील ३ वर्ष (२०१९-२० ते २०२१-२२) चे Balance Sheet ताळेबंद (होय/नाही)

४. फर्मने मागील ३ वर्षात केलेल्या संस्थांच्या लेखा परीक्षणची विहित नमुन्यातील माहिती (अ.क्र. ८ वरील) (होय/नाही)

५. फर्ममधील उपलब्ध कर्मचारी वर्ग/पार्टनर्सच्या महितीचे विहित नमुन्यातील प्रपत्र स्व प्रमाणित करुन (अ.क. ९) वरील (होय/नाही)

६. जिग्राविय‍ं चे लेखापरिक्षण यापूर्वी केले असल्यास त्या अनुभवाचे प्रमाणपत्र (होय/नाही)

७. शासन नियम व अटी मान्य असल्याचे संमतीपत्र (होय/नाही)

८. फर्मचे मागील तीन वर्षाचे आयकर विवरणपत्र (होय/नाही)

९. जि.ग्रा.वि.यं. चे मागील सलग ३ वर्षाचे लेखापरीक्षण केले नसल्याचे प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांचे प्रमाणपत्र (होय/नाही)

१०. फर्म काळया यादीत नसल्याबाबत स्वसाक्षांकित प्रमाणपत्र (होय/नाही)